# नेटभेट

ई-मासिक मे २०११



# नेटभेट ई-मासिक मे २०११

**प्रकाशक आणि संपादक -**

- सलिल चौधरी salil@netbhet.com
- प्रणव जोशी pranav@netbhet.com

**मुखपृष्ठ -**

- सोनाली घाटपांडे sonalig@netbhet.com

**लेखन -**

- अपर्णा संखे asankhe@gmail.com
- विशाल कुलकर्णी vkulkarni.omnistar@gmail.com
- कविता नवरे kavita.navare@gmail.com
- डॉ. अशोक कुलकर्णी drapkulkarni@gmail.com
- सलील चौधरी salil@netbhet.com
- श्रीकृष्ण सामंत shrikrishnas@gmail.com
- आनंद घारे abghare@yahoo.com

© या पुस्तकातील सर्व लेख, चित्रे, फोटोग्राफ्स यांचे हक्क लेखकाच्या स्वाधीन.

© नेटभेट लोगो, नेटभेट इ-मासिकाचे सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

संपर्क- सलील चौधरी , प्रणव जोशी
www.netbhet.com
४९४, विनित अपार्टमेंट्स, साई सेक्शन, अंबरनाथ (पूर्व), ठाणे ४२१५०१

**नेटभेटच्या या अजून एका चटपटीत आणि चवदार अंकात आपले बहारदार स्वागत !**

**विविधरंगी कथा, लेख, प्रवासवर्णन याचा खजिना म्हणजे हे ई मासिक.**

**अनेक विविध ब्लॉगस आणि नवनविन लेखांचा खजिना तुम्हाला www.netbhet.com येथे नक्की वाचायला मिळेल. तशीच नवनवीन ई-पुस्तके ही या साईटवर उपलब्ध आहेत.**

**उन्हाळा सरताना पावसाच्या हलक्या सरी मन प्रसन्न करून जातात तशा या लेखांच्या अवचित सरी तुमच मन नक्की प्रसन्न करून जातील.**

नेटभेट.कॉम चे आणखी काही उपक्रम !

- **सोनाली**

# संदेश

प्रिय अपर्णास,

आत्ताच तुझा ऋषांक पालथा पडतोय हा बझ पाहिला आणि "यार मला यावेळीतरी मुलगी हवी होती रे" वाला आपला फ़ोन आठवला. हे पत्र लिहिताना आता किती वर्षे झाली आपल्या मैत्रीला हा प्रश्न अर्थातच आपण मुदलात आणत नाही कारण ते मोजायचं नाही हे आपलं कधीच ठरलंय...(आता इथे माझा पहिला वन-वे ब्रेक-अप आणि नंतर सारख्याच वेगवेगळ्या मुली आवडल्यामुळे सारखे-सारखे झालेले वन-वे ब्रेकअप याचा हिशेब काय करतेस?? माहितेय त्यात माझ्या लग्नाला झालेली वर्षे मिळवली की तितक्या वर्षांची आपली मैत्री....जाऊदे नं पण याची चर्चा तुझ्या ब्लॉगवर कशाला गं?? शेवटी प्रत्येकवेळी माझ्या पैशाने ते आपण कॅफ़े अल्फ़ातल्या पाव-भाजी आणि फ़ालुद्यात बुडवले त्याचा हिशेब कुठे मी करतोय... असो,तुझ्या ब्लॉगसाठी पत्र लिहायला बसलो म्हणून हे तेल च्यायला मध्येच ओततोय झालं) हा तर मूळ मुद्दा, तुझा जुना मित्र म्हणूनच नव्हे तर एका मुलीचा बाप या नात्याने दुसरा मुलगा झाल्याबद्द्ल तुझं अभिनंदन करायची ही संधी मी घेतोय(म्हणजे जाहिररित्या गं... ट्युबलाइट).

हे बघ सर्वप्रथम हे लक्षात ठेव की मला चांगलं ठाऊक आहे की तुला मुली (किंवा तुझ्याच शब्दात मुली"**च**") आवडतात. या पार्श्वभूमीवर आता दुसरा(ही) मुलगा झाल्याचे काही फ़ायदे मला स्वतःला एक मुलगी आहे या अनुभवाधारे सांगावे म्हणतो.

हे बघ तुला मुलीला सजवायला आवडेल असा तुझा जो गैरसमज आहे तो ती मुलगी चुटूचुटू बोलायला लागली की लगेचच दूर होईल. कारण मग तुला तिला फ़क्त कपाटातच नव्हे तर दुकानातही कपडे, दागिने, टिकल्या, पर्स आणि जे काही तयारी या प्रकारात मोडतं ते तिच्याच मर्जीने घ्यावे लागेल. त्यात निव्वळ तुझी ती मुलगी सजवायची इच्छाच कमी होईल असंही नाही पण हे सर्व आताशा खूप वेळखाऊही होतंय ही नवी तक्रार तू करशील याची तुझा जवळचा मित्र म्हणून माझी खात्री आहे. कॉलेजमध्ये तुच तर आमच्या ग्रुपमधली टॉम बॉय होतीस नं जिला आम्ही आतापर्यंत आमची सगळी सिक्रेट्स सांगितली. ती काय तू तशी टिपिकल मुलगी होतीस म्हणून नव्हे तर तू आमच्याच पक्षातली जास्त होतीस..असो..या विषयावर नंतर जमेल तसं विषयांतर करेनच.

बघ आता सजवायची हौस अशी दोनेक वर्षांतच भागल्यामुळे पुढची वर्षे किती हालात जातील याची जरा कल्पना कर. त्यातुन काही अज्ञात कारणांमुळे तुझा परदेशातला मुक्काम पंचवार्षिक दराने वाढतोय. तो असाच वाढला आणि ही मुलगी तिथेच वाढली तर विचार कर ती लवकरच डेटिंग, प्रायव्हसी अशा मागण्या करील तेव्हा काय होईल? अर्थात मुलगे असं करणार नाहीत असं मी अजिबात म्हणत नाही. पण तरी आठव तुच मागे म्हणाली होतीस तुझ्या तिथल्या एका ओळखीच्या कुटूंबातील चार-पाच वर्षांच्या मुलीने आईकडे उन्हाळ्यात बिकीनीशिवाय पुलवर कसं जायचं विचारलं होतं आणि त्यांच्यापेक्षा तुलाच टेंशन आलं होतं ते.... मुलगे असल्यामुळे ही पंचवार्षिक योजना वाढवायची झाल्यास तुला थोडी तरी उसंत मिळेल.

तू जरी आमच्या सर्वांची खूप छान मैत्रीण असलीस तरी असं नॉर्मली (म्हणजे नॉर्मल मुलगी) आणि मुलगा यांच्यात सुरुवातीला भांडणं जास्तच होतात हा एक मुद्दा लक्षात घेतलास तर आता आरुषला त्याच्या खेळात सहभागी व्हायला एक मुलगाच मिळतोय याचा फ़ायदाही लक्षात घे. त्याची जुनी मुलांची खेळणी उपयोगात तर येतीलच (माहितेय मला तुला संपुर्ण भातुकली, बाहुलीचं घर इ.इ. घ्यायचं होतं...पण ते दुसऱ्या कुठल्याही मुलीला घेऊन दे गं(मी घेतलंय कधीच नाहीतर उगाच माझ्याकडचा पसारा वाढवशील..नाहीतर असंच आणून ठेव) पण तू आरुषला थोडंस चढवलंस तर तो आपल्या लहान भावाला त्याच खेळण्यांबरोबर खेळायला मदतही करील. शिवाय बघ आपण याच्यासाठी नवीन नाही आणत आहोत असं सांगुन तू त्याला आणखी चढवू शकशील.मुलांना चढवायला वेळ लागत नाही (तिथेही मुलीच जास्त वेळखाऊ असतात) हा मुद्दा तुझ्यासारख्या सुज्ञीस सांगणे न लगे काय??

दोन दोन मुलगे असण्याचे काही तोटेही आहेत आणि एक मित्र म्हणून त्यांचीही जाणीव तुला करून द्यावी म्हणतो.मुलांची भूक मोठी असते आणि तुझं स्वयंपाकघरातलं कौशल्य आणि आवडही (म्हणजे खायची गं) मला चांगली माहितेय. तर तुला करता येत नाहीत म्हणजे तुझ्या मुलांना पोळ्याच आवडणार हे लक्षात ठेव आणि त्याची सोय आधीच करून ठेव. किंवा तुझ्या पंचवार्षिक योजना संपवुन परत यायचं अशा दरम्यान प्लान कर की त्यांची वाढती भूक आणि आपल्या देशात मिळणारी पोळीवाली बाई (ती आधीच तुझ्या रोज स्वप्नात येत असेलच) यांच्या वेळेचा योग्य ताळमेळ घालता येईल. शिवाय दुसरा मुलगा आल्यामुळे तुझ्या घरात आता तू फ़ॉर गुड मायनॉरिटीमध्ये आहेस हे लक्षात ठेव. पण फ़ंद-फ़ितुरीचा योग्यवेळी

लाभ घेता आल्यास हा तोटा थोडाफ़ार कमी करता येईल. शिवाय समज तुला अगदी मुलीच जातात अशा कार्यक्रमाला जायचं असेल तर तुला प्रायव्हसी मिळण्याचा (आणि एक दिवस हक्काने पोरांना बाबाकडेच द्यायचा)आपोआपच फ़ायदा होईल.

बाबाचं नाव निघालंच आहे तर परत एकदा फ़ायद्यांकडेच वळावंसं वाटतं..अगं आता तुला बाहेर गेल्यावर मुलांना शी-शुला न्यायला (पुन्हा एकदा) हक्काने बाबाकडे पाहता येईल. आरुषमुळे तशीही त्याला सवय झालीच आहे त्यामुळे तोही काही नाही म्हणणार नाही. खरेदीच्या वेळीही तुला त्यांचे तेच तेच कपडे पाहायचा कंटाळा आल्यास बाबाला तुला मुलांच्या खरेदीतलं कळतं मग तू निवांत तुमच्या मुलींच्या सेक्शनकडे टाइमपास करुन आलीस तरी चालेल. अगं तसंही तू त्यांची खरेदी केलीस तरी तुझ्याच शब्दात सांगायचं तर कपडे काय घेणार शर्टच्या ऐवजी टी-शर्ट, हात सिझनप्रमाणे मोठे किंवा छोटे, रंग तेच मुख्य निळ्याच्या शेड्स नाहीतर एखादा पिवळा,हिरवा किंवा गेला बाजार भगवा, पट्ट्या उभ्या आडव्या किंवा चौकडी आणि पॅंट या प्रकाराबद्दल तर चर्चाच नको. हाफ़ की फ़ुल ते ठरवलं की फ़क्त काळा, निळा की उजळमध्ये फ़ेंट चॉकलेटी नाहीतर जीन्स...बास....त्यावर दागिने,पर्स, टिकल्या काहीही नको...इन फ़ॅक्ट हेच बजेट तू तुझ्यावर खर्च करु शकतेस. आहे की नाही फ़ायदा.

आणि हे बघ मुलगा झाला तरी शेवटी तो आपल्या आईचा लाडका असतो आणि मुख्य आईच्या तेवढ्याच जवळ असतो. पुढे मागे बायकोमुळे त्याला आईला वेळ देता नाही आला तरी आईसाठीचं प्रेम हे असतंच ते आतापास्नं त्याच्या मनात कसं जोपासायचं ते तू बघ. मुली आपल्या जागी असल्यातरी मुलगाही खंबीरपणे आई-बाबांच्या पाठी उभा राहू शकतो. आईवरुन आठवलं.. आता आई आहे नं तुझ्याकडे आणि ती जे करु शकते ते मी तिच्या वयात (जर पोहोचले तर अर्थात) करू शकेन की नाही असं नेहमी म्हणतेस नं? मग फ़ायदा आहे नं तुझा..अगं जेव्हा (मी "जेव्हा" म्हणतोस नाहीतर वस्सकन अंगावर येशील) तू आजी होशील तेव्हा ती जबाबदारी कदाचित आपसूकपणे परस्पर तुझी विहीण उचलेल नं....आई गं...जास्तच आगाऊपणा करतोय का मी??

असो. सांगायचा मुद्दा म्हणजे आता मुलगी हा शब्द फ़क्त स्वतःकरता ठेव आणि आपल्या ग्रुपमध्ये जसा दंगा व्हायचा तोच घरात पण करायला तयार रहा..आम्ही मुलीवाले आहोतच तुझ्या घरगुती गमती-जमती ऐकायला. तसंही आरुष तुला "आई तू काय कत्तो?" म्हणताना ऐकलंय मी. खरं सांगतो कॉलेजमधले दिवस आठवले...

असो नमनाला आणि सगळे मुद्दे संपले तरी न संपलेलं तेल खपवायला माझ्याकडे इतका वेळ नाहीए गं..शेवटी एका मुलीचा बाप आहे मी..त्यामुळे सध्या घरातला वेळ हा फ़क्त तिनं डोकं खायला राखुन ठेवला आहे....

हा तर आता वरच्या पत्रातलं फ़क्त मुद्द्याचं (हो तेच ते कंस आणि तेल सोडून बाकीचं) वाचलंस तर तुला कळेल की एक काय दोन काय मुलगा व्हायचे बरेच फ़ायदेही आहेत तेव्हा त्याचा विचार कर आणि शांतपणे आज आरुष लवकर झोपलायस म्हटलं तर निवांत झोप...तुझ्याकडे तुझी काळजी करायला थ्री इडियट्स समर्थ आहेत आणि त्या वासरात एकटीच शहाणी गाय व्हायच्या संधीचा फ़ायदा घे....

प्रत्येक मुलीकडून पोळल्यावर (अगदी स्वतःच्या पण) तुझी मदत घेणारा,

तुझाच मित्र.....

➤ अपर्णा संखे http://majhiyamana.blogspot.com

# मी, माझी मैत्रिण आणि सिंडरेला बूट

जनरली मला दहा काय पण चार दुकानही फिरायचा कंटाळा येतो खरेदीला गेल्यावर, त्यातून चप्पल खरेदी म्हणजे तर काय बघायलाच नको. चप्पलेचं आणि माझं एकमत कधीच होत नाही. जी चप्पल मला आवडते ती माझ्या पायाच्या मापाची नसते. एखादी चप्पल आवडलीच आणि मापाचीही निघाली तर ती रोजच्या ट्रेन प्रवासात टिकाव धरेल इतपत भक्कम नसते. जी भक्कम असते ती दिसायला तितकिशी आकर्षक नसते. एक ना दोन नाना तऱ्हा....आणि येव्हढाऽऽ चोखंदळ पणा करुन चप्पल घेऊन बाहेर पडावं, तरिही दरवेळी दुसऱ्या कुणाच्या चपला बघितल्या की वाटतं "आयला ह्यांना कशी बहुदुधी आखूड शिंगी गाय" मिळते?

तर त्या दिवशीही नेहमी प्रमाणेच अगदी तस्सच झालं. आधीच मला "तिच्या" प्रत्येक गोष्टीचं अपाऽऽर कौतूक आहे. तिच्या दिसण्याचं.. तिच्या रहाण्याचं.. तिच्या लिखाणाचं आणि तिच्या छंद जोपासण्याचं सुद्धा.

त्याचं काय आहे ना...तिचं एक मस्त छानसं, छोटसं घर आहे...तिच्या चौकोनी कुटूंबाभोवती फिरणार त्यांचं एक वर्तुळ आणि त्या वर्तुळाच्या जोडीने तिची तिची अशी जपलेली छोटी मोठी वर्तुळं... मला सगळयाचच अपाऽऽर कौतुक आहे, अगदी पहिल्या भेटीपासूनच. (प्लीज नोट वर्तुळं म्हणजे विबासं नव्हे )

तर त्या दिवशी आम्ही भेटलो तेव्हा तिच्या पायात एकदम "आखुड शिंगी बहुदुधी गाय" टाईपच्या म्हणजे दिखाऊ + टिकाऊ टाईपच्या चप्पला होत्या. त्या तिने "अमक्या ढमक्या दुकानात सेल मधे घेतल्या म्हणे दोनच दिवसा पुर्वी" मी देखील नेमके दोनच दिवसा पुर्वी बरीऽऽऽच दुकानं फिरुन शेवटी एका चप्पलेवर शिक्कामोर्तब करुन माझ्याकरता नविन जोडे घेऊन आलेले. माझ्या नविन जोड्यांचं नवखेपण जागोजागी लावाव्या लागलेल्या बँडेड मधुन जाणवत होत.

माझ्या पायाची आणि त्यांची अजून म्हणावी तशी युती काही होत नव्हती.
पण ती मात्र सिंडरेलाच्या गोष्टीतली सिंडरेला असावी तसे तिचे जोडे तिला फिट्ट बसलेले. ना

कुठे सोलवटण्याचे व्रण होते ना कुठे बँडेड चे ठिगळ.

मग का नाही मनातल्या मनात तिचा हेवा वाटणार, सांगा बर? उगाचच आपलं मनात आलं तिचे "हे" बुट तरी एखाद दिवस मला मिळाले घालायला तर...!
हे असं वाटणं म्हणजे ते शाळेत निबंधाला विषय असतो तसं झालं पण आता तसं वाटलं खरं त्याला काय करणार!

पण कधी कधी(च) तुमची प्रार्थना इंन्स्टंट फळाला येते आणि तुमचं नशिब तुम्हाला "छप्पर फाडके" देतं (निदान तसं भासवतं तरी), तर तो दिवस देखील त्या "कधी कधी" पैकीच एक असावा , कारण त्या दिवशी गप्पांच्या नादात माझ्या घरुन निघताना ती नेमकी चुकून माझे बुट घालून घरी गेली आणि तिच्या त्या "सिंडरेला बुटांना" माझ्याच घरी विसरुन गेली.

सिंडरेलाला तिचा तो एक हरवलेला बुट आणि त्या जोडीने भाग्य परत मिळाल्यावर जेव्हढा आनंद झाला असेल त्याच्या कैकपटीने अधिक आनंद मला त्या दिवशी तिचे बुट मिळाल्यावर झाला.

हळूच पाय त्या बुटात घालून बघितला. मस्त वाटलं एकदम. मग चालून बघण्याचा मोह झाला. चार पावलं चालताना एकदम भाऽऽरी फिलिंग आलं. मग दिवसभर तिच्याच बुटात पायाला अडकवून पायाला भिंगरी लावून निघाले फिरस्तीला, औटघटकेचं म्हणतात तसलं राज्य अनुभवायला. एकिकडे कॉन्शस का काय म्हणतात तो म्हणत होता "तिचे बूट परत करुन ये, दुसऱ्याच्या वस्तू वापरु नयेत" इत्यादी इत्यादी. पण मनातल्या हेव्याने त्यावेळी तरी त्या कॉन्शसला गप्प बसवलं.

टेलिफोनचं बील भरायला रांगेत उभी राहीले तेव्हा उगाचच वाटत होतं रांगेतल्या एकूण एक बायका माझ्या बुटांकडेच बघतायत म्हणून. समोरची प्रत्येक व्यक्ती माझ्या त्या सिंडरेलावाल्या बुटांचा हेवा करतेय असं वाटून गेलं.. उगाचच. आणि त्याचीही गंमत वाटली.
बीलं झाली भरुन... बाजारहाटही करुन झाला. आठवून आठवून कामं काढून जास्तीत जास्त वेळ त्या बुटाचा सहवास मिळवायचा प्रत्येक ठराव मनाने पास केला.

थोडावेळ बरा गेला, पण कधी कोण जाणे हळूच त्रासाने डोकं वर काढलं, पायांना जरा जरा त्रास जाणवायला लागला. कधी त्या बुटांच्या हिल्स मुळे पाय पटकन मुडपला जाऊन दुखायला

सुरुवात झाली तर कधी त्या बंद बुटांमुळे पायाला चांगलाच घाम फुटायची वेळ आली. पायाचा अंगठाही जरासा का होईना सोलवटला, मग वाटेत थांबून दुखावलेल्या अंगठ्याला बँडेड लावून झाली. समोरुन बघणाऱ्याला बंद बुटाआड लावलेली बँडेड दिसत नव्हती खरी आणि त्यामुळेच बुटांकडे वळणाऱ्या नजरांमधला भाव अजुनही तोच होता फक्त त्याची आता मला गंमत वाटत नव्हती . त्या दुखण्याने एकंदरीतच माझ्या चालण्याचा स्पीड चांगलाच मंदावला होता आणि मंदावणाऱ्या स्पिड बरोबर ते सिंडरेलाचे बुट घालण्याचा उत्साह पण मावळला होता.

दुखऱ्या पायावर आणि हिरमुसल्या मनावर फुंकर मारत मी मग ऑटोने घरी येणच पसंत केलं. घरी येऊन टेकते नाही तोच बेलच्या हाकेला ओऽऽ देत मला दार गाठावं लागलं.

दारात माझी तिच ती "सिंडरेला बूऽट" वाली सखी, जिचं मला अपार कौतुक आहे..उभी होती... तिच्या स्वत:च्या दुखऱ्या पायावर फुंकर मारत आणि एका हातात माझे बूट सांभाळत.

**कविता नवरे** http://sahaj-suchala-mhanun.blogspot.com

# अंदमानची तीर्थयात्रा

कधीचं चाललं होतं. शेवटी योग आला आणि तो सुद्धा असा की स्वातंत्र्यवीरांच्या त्या ऐतिहासिक उडीला शंभर वर्ष झाल्याची. २५ डिसेंबर २०१० ला रात्री त्या प्रसिद्ध सेल्युलर जेल

पाशी पोहोचलो. हे जेल आता राष्ट्रीय स्मारक म्हणून जतन केलं आहे.तिथं रात्री लाईट एंड साऊंड शो असतो. जेल च्या समोरच एक उद्यान आहे. तिथं स्वातंत्र्य योद्ध्यांचे पुतळे आहेत. तिथून रात्री दिसणारं हे विहंगम दृष्य....



रात्री दिसणारं हे जेल. या हिरवळीवरच लाईट ~एंड साऊंड शो होतो. रात्रीच्या वेळी जेलची भव्यता अंगावर येते. मध्यभागी पुतळा ठेवला आहे ती फांशी देण्याची जागा. त्याच्या डावीकडे खूर्ची ठेवलेली दिसते. ती जेलरची बसण्याची जागा.ऊंचावर स्काय लाईन्वर दिसतोय तो ऑब्झर्व्हेशन टॉवर....



जेलच्या आवारातला हा वटवृक्ष. त्या कारागृहात घडलेल्या अत्याचारांचा मूक साक्षीदार... हा वटवृक्षच आपल्याला कहाणी सांगतोय अशी कल्पना करून लाईट एंड साऊंड शो पुढे सरकतो. काय भन्नाट कल्पना आहे नाही? आम्ही ऐकला तो शो हिंदीत होता. काय आवाज होते सांगू एकेकांचे. आणि सावरकरांपाशी कथानक आलं आणि त्यांची "जयोस्तुते" ही कविता... तीही चक्क मराठीतून.. कानावर आली आणि मला अश्रू आवरले नाहीत.. हा फोटो मात्र दुस-या दिवशी सकाळी काढलाय. कारण रात्री कारागृहातल्या सगळ्या गोष्टी पहाता येत नाहीत....



कारागृहाच्या म्युझियम मधे ठेवलेलं हे मॉडेल. यातल्या तीनच विंग्स आता अस्तित्वात आहेत.




कारागृहात्ल्या एका विंगच्या दुस-या मजल्यावरच्या शेवट्च्या खोलीत सावरकरांना ठेवलं होतं. फोटोत दिसतेय ती हीच विंग, याच्या अगदी टोकाशी जी खोली आहे ती साव्रकरांची. तिथं त्यांना दहा वर्ष ठेवलं होतं. त्यांचे बंधू त्याच तुरुंगात आहेत हे त्याना बरेच दिवस माहित नव्हतं...



कारागृहातल्या "त्या" खोलीच्या हा आतला भाग. तिथं लावलेला हा सावरकरांचा फोटो. याच भिंतींवर त्यांनी आपल्या काही कविता लिहिल्या होत्या.. पाठमोरी दिसतेय ती माझी पत्नी सौ. सुरेखा.....



बरोबर आलेले सर्व कुटुंबीय सावरकारांच्या त्या कोठडीतून बाहेर पडले पण मी मागेच रेंगाळलो. कोठडीचा लोखंडी दरवाजा अत्यंत मजबूत. इत्का की दहा जणानी हातोडीनं दहा दिवस ठोकलं तरी दाद देणार नाही. दरवाजाचे कडी कोयंडे पण मजबूत. मी दरवाजा बंद करून त्याच्या मजबूतीचा अंदाज घेत असतांनाच माझ्या मुलीनं माझा फोटो काढला आणि लक्षात आलं की मी त्या कोठडीत एकटाच आहे आणि मग काय सांगू अंगावर असा सरसरून कांटा आला की सांगता सोय नाही. त्या दोन सेकंदात सावरकरांच्या जागी आपण असतो तर काय झालं असतं या नुसत्या कल्पनेनंच दरदरून घाम फुटला. माझी ही मानसिक अवस्था या फोटोत आलीय असं मला आता हा फोटो बघून वाटतंय..



कैद्यांना या घाण्याला जुंपून नारळाचं तेल काढून द्यावं लागे. काही जणानी तसा प्रयत्न करायला सुरूवात केल्यानं घाणा खराब होवू नये म्हणून आता त्याला स्पर्श करता येवू नये अशी व्यवस्था करण्यात आलीय...



कारागृहात चोवीस तास तेवत असणारी स्वातंत्र्यज्योत... यासाठीस असंख्य योद्ध्ये शहीद झाले...



अंदमानला आपल्या वास्तव्यानं पुनीत करणा-या वीरांची स्मृती जागवणारा स्मृतीस्तंभ. तत्कालीन राष्ट्रपती ग्यानी झैल्सिंगजी यांचे हस्ते याचं अनावरण झालं....



१५ ऑगष्ट १९४७ ला "द स्टेट्स्मन" मधे झळकलेली भारताला स्वातंत्र्य मिळाल्याचे सांगणारी हेड्लाईन. आधुनिक जगानं भारताची दखल घ्यायला सुरुवात केली ती अशी... १५ ऑगष्ट १९४७ ला "द स्टेट्स्मन" मधे झळकलेली भारताला स्वातंत्र्य मिळाल्याचे सांगणारी हेड्लाईन. आधुनिक जगानं भारताची दखल घ्यायला सुरुवात केली ती अशी...

http://lh4.ggpht.com/_2jBooY2dv7I/TSdNDGAsvEI/AAAAAAAAA38/OwMDY7zI6vA/s8...


The statesman- 15th August 1947
The Statesman
TWO DOMINIONS ARE BORN
Close Friendship with Britain
First Governor of W. Bengal
Joyful Scenes In Calcutta
OM

➤ डॉ अशोक कुलकर्णी

# दुरदर्शन - सत्यम शिवम सुंदरम !

आज मी नॉस्टॅल्जीक झालोय. ( nostalgia = भूतकालीन जीवनाविषयी वाटणारी ओढ). आणि हा लेख वाचताना तुम्ही पण व्हाल याची मला खात्री आहे. मित्रांनो स्वतंत्र भारतातील एका पुर्ण पीढीवर आई-वडील आणि शिक्षकांव्यतीरीक्त आणखी एका गोष्टीने संस्कार केले आहेत. ती गोष्ट म्हणजे टेलीव्हिजन. (TV). आणि मी ज्या पीढीचं प्रतीनिधीत्व करतोय त्या पीढीसाठी संस्कार करणारा TV म्हणजे दुरदर्शन. आज मी नॉस्टॅल्जीक झालोय ते दूरदर्शन साठीच.

दूरदर्शनवरील जुन्या मालिका, जाहिराती, लहान मुलांसाठीचे कार्यक्रम, घरातील प्रत्येकाला भावणाऱ्या आणि बांधून ठेवणाऱ्या मालिकांची आठवण झाली की "बालपणीचा काळ सुखाचा आठवतो". आता शंभराहून अधिक चॅनेलवर सर्फींग करुनही कधीच मिळणार नाही इतका आनंद दुरदर्शनच्या DD1 आणि DD2 या दोन वाहिन्यांनी आपल्याला दिला आहे. आणि नेमका तोच अनुभव आज आपण पुन्हा अनुभवणार आहोत. आज मी तुम्हाला एका ब्लॉगची माहिती करून देणार आहे. हा ब्लॉग पुर्णपणे दुरदर्शनला वाहिलेला आहे.

दूरदर्शनवर गाजलेल्या तलाश, फौजी, उपन्यास, सुरभी, अलिफ लैला, टीपू सुलतान, चंद्रकांता, व्योमकेश बक्षी, अजनबी, दिदी, चुनौती या मालिकांचे काही भाग किंवा शिर्षकगीते पुन्हा पहायला मिळाल्यातर आवडतील ना तुम्हाला ? वीस वर्षांपुर्वी (माझ्या ईतक्याच) लहान असलेल्या)माझ्या मित्रांनो जर He-man and masters of the Universe, Giant Robot, Jungle Book (मोगली), पोटली बाबा की, मालगुडी डेज या मालिकांचे भाग आणि शिर्षकगीते पुन्हा पहायला मिळाली तर काय मज्जा येईल नाही?

मालिका आणि लहान मुलांच्या कार्यक्रमांव्यतीरीक्त आणखी एक गोष्ट म्हणजे पुर्वीच्या जाहिराती. अमुल बटर, बुलंद भारत की बुलंद तस्वीर....हमारा बजाज, गोल्डस्पॉट, I love you रसना, जोर लगाके हैय्या (Fevicol) या जाहिराती पुन्हा पाहण्याची एक वेगळीच मजा आहे.

मला खुप खुप आवडणाऱ्या काही मालिका आणि जाहिरातींचे व्हीडीओज मी येथे देत आहे.

**एक अनेक और एकता (Ek anek aur ekta)**

http://www.youtube.com/watch?v=04SC6FDt-lY




**मिले सुर मेरा तुम्हारा)Mile Sur mera tumhara)**

http://www.youtube.com/watch?v=ken1pQ2Do8g




**जायंट ऱोबोट )Giant Robot)**

http://www.youtube.com/watch?v=cTftcPlWDIM



## वंदे मातरम

http://www.youtube.com/watch?v=Pmy4HOn1NWs



## आय लव्ह यु रसना !

http://www.youtube.com/watch?feature=player_embedded&v=CWC1wj0lkcI



### जब मे छोटा बच्चा था .बजाज लाईट्स !

http://www.youtube.com/watch?v=eHuIg9HQepg




### नटराज पेन्सिल्स

http://www.youtube.com/watch?feature=player_embedded&v=RRpBycOA5ds




**Heman and masters of the Universe**
http://www.youtube.com/watch?feature=player_embedded&v=sM7Jx8oggCE



**दुरदर्शन**

http://www.youtube.com/watch?v=7H17LaAnkQQ&feature=player_embedded





दुरदर्शनची पुन्हा एकदा सफर घडवून आणणाऱ्या ब्लॉगची लिंक आहे **http://ddnational.blogspot.com**.

खरेतर हा दुरदर्शनचा अधिकृत ब्लॉग नाही आहे मात्र तरी देखिल एक अनमोल खजिना आहे. तेव्हा या ब्लॉगला अवश्य भेट द्या. आणि ते पाहून नॉस्टॅल्जीक झालात तर मला दोष देऊ नका.

➤ सलील चौधरी http://www.netbhet.com

# अणूऊर्जेपासून विजेची निर्मिती



शिकागो पाईल - १ - पहिला मानवनिर्मित रिॲक्टर

एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस विजेचे उत्पादन आणि पुरवठा करण्याचा उद्योग व्यावसायिक तत्वावर सुरू झाला होताआणि (हैड्रो) त्यात मुख्यतः जलविद्युत . औष्णिक (थर्मल)वीजकेंद्रे होतीज्या ठिकाणी नदीला धरण बांधून तिचे पाणी . साठवून ठेवणे शक्य असेल अशा जागी धरण बांधतात, त्याच्या जलाशयातल्या पाण्याचा प्रवाह वळवून तो टर्बाइन नावाच्या यंत्रांमधून नेला जातो आणि त्या प्रवाहामुळे त्या यंत्रांच्या गोल फिरत असलेल्या चक्राच्या दांड्याला जोडलेल्या जनरेटरमध्ये विजेची निर्मिती होतेभूगर्भातील कोळसा किंवा . तेल, वायू वगैरे इंधने औष्णिक केंद्रांमध्ये जाळून त्या ऊष्णतेच्या उपयोगातून पाण्याची वाफ केली जाते आणि त्या वाफेच्या सहाय्याने वेगळ्या प्रकारच्या टर्बाईन यंत्रांची चक्रे फिरवली जातात .शून्यातून ऊर्जा निर्माण करणे ही गोष्ट वैज्ञानिक दृष्ट्या केवळ अशक्य असल्यामुळे निसर्गातच पण वेगळ्या स्वरूपात उपलब्ध असलेल्या ऊर्जेचे विजेमध्ये रूपांतर करण्याचे काम ही केंद्रे करतातऊन ., वारा, समुद्राच्या लाटा यासारख्या ऊर्जेच्या इतर नैसर्गिक स्त्रोतांचा उपयोग वीजनिर्मितीच्या कामासाठी करण्याचे प्रयत्नसुध्दा पूर्वीपासून केले जात आहेत, आता त्यांना अधिक प्राधान्य मिळाले आहे, पण आपल्या आवश्यकता भागवण्यासाठी पुरेशी वीज त्यांच्यापासून तयार करता येण्याची शक्यता मात्र अजून दृष्टीपथात आलेली नाही.

अणूपासून प्रचंड प्रमाणात ऊर्जा मिळण्याची शक्यता दिसू लागताच या बाबतीतले सर्व संशोधनकार्य अत्यंत गुप्तपणे केले जाऊ लागले सुमाराला दुसरे महायुध्दत्या . भडकलेले असल्यामुळे या ऊर्जेचा सर्वात पहिला जाहीर उपयोग मात्र हिरोशिमा आणि नागासाकी या जपानमधील शहरांचा पुरता विध्वंस करण्यासाठीच केला गेला. त्यामुळे अणूशक्ती ही एक केवळ महाभयानक आणि विनाशकारी अशा प्रकारची शक्ती आहे असा समज रूढ झाला आणि हा गैरसमज आजपर्यंत टिकून राहिला आहे, किंबहुना सध्या त्याला अधिक खतपाणी घातले जात आहे.

अणूऊर्जेवर अंकुश ठेवण्याचे प्रयोग ॲटमबॉंबच्या अनियंत्रित अशा विस्फोटाच्या आधीपासून केले जात होतेसाली न्यूट्रॉनचा शोध लागला १९३२ ., न्यूट्रॉनमुळे होऊ शकणाया- युरेनियमच्या भंजनाची क्रिया १९३८ साली समजली, त्यावरून १९३९ मध्ये न्यूक्लियर चेन रिॲक्शनची कल्पना मांडली गेली आणि १९४२ मध्ये ती क्रिया प्रत्यक्षात घडवून आणणारा पहिला रिॲक्टर कार्यान्वितसुध्दा झालाया सर्व . घटना निरनिराळ्या देशांमध्ये घडल्या होत्या यावरून हे काम किती तातडीने आणि एकाच काळात अनेक देशांमध्ये केले जात होते याची कल्पना येईल . अणूऊर्जेवर संपूर्णपणे आणि खात्रीपूर्वक असे नियंत्रण करणारी यंत्रणा तयार झाल्यामुळेच हा रिॲक्टर बनवता आला होता.मात्र हे सगळे काम गुप्तपणे चालले होते . बाहेरच्या जगाला त्याचा सुगावा लागू दिला नव्हता.

ॲटम बॉंबच्या आधी ॲटॉमिक रिॲक्टर तयार झाला म्हणजे नेमके काय झाले? "या दोन्हीमध्ये अगदी केसाएवढा सूक्ष्म फरक असतो, रिॲक्टरचे रूपांतर कोणत्याही क्षणी बॉंबमध्ये होऊ शकते.समजूत अनेक उच्चशिक्षित लोकांची सुध्दा असणे शक्य आहे(गैर) अशी ". सर्वसामान्य लोकांच्या मनात दोन्हीबद्दल तेवढीच भीती असतेया बाबतीत . बाळगण्यात येणाया कमालीच्या - गोपनीयतेमुळे तसे झाल्यास आश्चर्य नाही, पण सत्यपरिस्थिती वेगळी असतेनिदान समाजाचे . नेतृत्व करणारे लोकनेते आणि वर्तमानपत्रांचे संपादक या मंडळींनी अशा प्रकारची भन्नाट विधाने करण्याआधी त्यासंबंधी थोडा अभ्यास केला तर ते समाजाच्या दृष्टीने बरे होईल.

सोप्या उदाहरणाने सांगायचे झाले तर नवरात्रामध्ये नऊ दिवस देवघरात अखंड तेवत राहणारी समई आणि दिवाळीच्या दिवशी उडवलेला सुतळी बॉंब यात जेवढा (रात्री) फरक असतो तेवढाच फरक ॲटॉमिक रिॲक्टर आणि ॲटम बॉंब यांच्या रचनेमध्ये असतोसुतळी बॉंबच्या वातीला .

बत्ती दिली की ती आतपर्यंत जळत जाते, आत ठेवलेल्या स्फोटक दारूचे अत्यंत वेगाने ज्वलन होऊन त्यातून जी ऊर्जा बाहेर पडते ती तप्त वायूंच्या दाबाच्या रूपात बाँबच्या कवचाच्या आतमध्येच साठत जाते, तसेच बाँब बनवतांना स्फोटक द्रव्यांना सर्व बाजूने गुंडाळलेल्या त्याच्या आवरणाला आतून जाळत जाऊन त्याला कमकुवत बनवत जातेहे सगळे . क्षणार्धात घडत असतांना अंतर्गत दाब सहन न झाल्यामुळे ते कवच अनेक बाजूंनी फाटते आणि त्याच्या चिंधड्या उडवून आतील सारी साठलेली ऊर्जा एकाच वेळी बाहेर पडल्यामुळे त्याचा मोठा स्फोट होतोया उलट देवघरातील समई त्यात तेल . असेपर्यंत मंद उजेड देत राहतेत्या तेलामधील . एक एक सूक्ष्म थेंब वातीमधून हळूहळू ज्योतीत जातो आणि जळत राहतोसमईमध्ये . असलेल्या सगळ्या तेलामधील सर्व राखीव ऊर्जेचा एकदम स्फोट होण्याची शक्यता नसते . रिअॅक्टरचे रूपांतर बाँबमध्ये होण्याची शक्यता यापेक्षा कमी असते, किंबहुना ते कदापि शक्य होऊ नये यासाठी खास काळजी त्याच्या रचनेत अनेक प्रकारांनी घेतलेली असते. एकाद्या माथेफिरू अतिरेक्याने ठरवून तसे करायचे ठरवले तरीसुध्दा ते घडण्याची शक्यता नसते.

आता अॅटॉमिक रीअॅक्टरचा थोडासा पूर्वेतिहास पाहूसाली न्यूट्रॉनचा शोध लागला १९३२ . म्हणजे नेमके काय झाले? ते तर प्रत्येक द्रव्याच्या अणूरेणूंमध्ये आधीपासून अस्तित्वात होतेच . त्या वर्षी केलेल्या प्रयोगांमध्ये त्यांना पहिल्यांदा अणूच्या गर्भामधून बाहेर काढून दाखवले गेले . याचा अर्थ भुईमुगाच्या शेंगातले दाणे काढून डब्यात भरून ठेवावेत तसे कोणी न्यूट्रॉन्सना बाटलीत भरून जगाला दाखवले असा होत नाही. एका विशिष्ट प्रक्रियेमध्ये क्षणभरासाठी न्यूट्रॉन्स एका अणूमधून बाहेर पडतात आणि लगेच ते अनंतात विलीन होऊन जाताततती . क्रिया घडवून आणणे आणि त्या क्षणापुरते त्या न्यूट्रॉनचे वेगळे अस्तित्व ओळखणे या गोष्टी एका शास्त्रज्ञाने साध्य करून दाखवल्याटेलीव्हिजन . आणि इंटरनेट यासारखी प्रभावी माध्यमे नसतांनाच्या त्या काळातसुध्दा ही बातमी जगभरातील वैज्ञानिकांमध्ये पसरलीनुसार त्या . न्यूट्रॉनचा झोत तयार करून त्याचे विविध पदार्थांवर होणारे परिणाम यावर सगळीकडे संशोधन सुरू झालेइतर सर्व पदार्थ . या सुट्या न्यूट्रॉन्सना लगेच गिळंकृत करून टाकत असतांना युरेनियम या धातूमधून मात्र दुप्पट तिप्पट संख्येने जास्तच न्यूट्रॉन्स बाहेर पडतात असे धक्कादायक निरीक्षण १९३८ साली प्रसिध्द झालेअसे (भंजन) या क्रियेला फिशन . नाव दिले गेलेही क्रिया सातत्याने घडवून आणत राहणे शक्य होत असेल तर . त्या क्रियांची एक वेगाने वाढत जाणारी साखळी बनवता येईल आणि (चेन रिअॅक्शन) त्यातून निर्माण होणाया - अनंतपटीने वाढवत नेता येईलन्यूट्रॉन्सची संख्या असा तर्क केला जाऊ लागलात्या वेळी हा .

फक्त तर्क होता, प्रत्यक्ष कृती करून तो पडताळून पाहणे आवश्यक होतेत्यासाठी नक .्की काय करायला हवे हा सुध्दा एक मोठा प्रश्न होताअनेक शास्त्रज्ञ त्यासाठी आपली बुध्दी . पणाला लावत होते.

ते काम करण्यासाठी अनेक प्रयत्न करून झाल्यानंतर १९४२ साली पहिला यशस्वी रिॲक्टर बनवला गेला त्याची चित्तरकथा मजेदार आहेज्या . प्रयोगशाळेत हा उभारायचे ठरले होते त्या ठिकाणी मजूरांचा संप सुरू झाला. शास्त्रज्ञ आणि सरकारचे संरक्षण खाते यांना तर हा प्रयोग करण्याची घाई झाली होती .शिकागो युनिव्हर्सिटीमध्ये एक ओस पडलेली जुनी इमारत होती . तिथल्या एका खोलीत ग्राफाइटचे खूप ठोकळे आणि युरेनियमच्या चकत्या या (पेलेट्स)ंची विशिष्ट प्रकारे रचना केली गेली त्या काळी .'रिॲक्टर' या शब्दाचा उपयोग सुरू झाला नव्हता . या रचनेला एक'ढीग (पाईल)' असे साधे नाव दिले. न्यूट्रॉन्सचे शोषण करण्यासाठी कॅड्मियमचा मुलामा दिलेल्या काही सळ्या त्या पाइलच्या आतबाहेर सरकवता येतील अशी व्यवस्था केली होतीत्यांना हळूहळू . पाईलच्या बाहेर काढले की चेन रिॲक्शन (वर उचलले) सुरू होऊन न्यूट्रॉन्सची संख्या वाढेल आणि त्यांना खाली सोडून आत ढकलले की चेन रिॲक्शन बंद पडून न्यूट्रॉन्सची संख्या रोडावेल अशी अपेक्षा होतीन्यूट्रॉन्सची आणि . रेडिएशनची अत्यंत सूक्ष्म गणना करणारी अचूक अशी उपकरणेच पाईलच्या आत चाललेल्या किंवा बंद पडलेल्या रिॲक्शनची माहिती पुरवणार होतीया . न्यूट्रॉन्सची अपेक्षित गणती अगदी नगण्य असल्यामुळे त्यांच्यापासून रेडिएशनचे दुष्परिणाम होण्याची भीती नव्हती तसेच यातून निर्माण होणारी क्षीण ऊष्णता वाहून नेण्यासाठी कसलीही व्यवस्था केलेली नव्हतीप्रयोगाचे . संचालक महान शास्त्रज्ञ एन्रिको फर्मी यांना हा प्रयोग हाताबाहेर जाणारच नाही याबद्दल एवढी जबरदस्त खात्री होती की त्यांनी कसल्याही प्रकारचे शील्डिंग सुध्दा बसवले नव्हते. आज कोणीही अशा प्रयोगाला सुध्दा अनुमती देणार नाही, पण युध्दपातळीवर चाललेल्या संशोधनाच्या त्या टप्प्यावर अशा रीतीने जगातला पहिला वहिला 'मानवनिर्मित रिॲक्टर' तयार झाल्याची अधिकृत नोंद झाली.

आजकालच्या अत्यंत गुंतागुंतीच्या रीॲक्टर्सशी तुलना करता हा प्रयोग पहायला गेल्यास फारच साधा होतात्या प् .रॉजेक्टवर काम करणाया शास्त्रज्ञांनी आणि त्यांच्या सहाय्यकांनीच त्यातले - ग्राफाईटचे ब्लॉक्स आणि युरेनियमचे पेलेट्स एका लाकडी सांगाड्यामध्ये हाताने रचले आणि त्यात आपले अंग आणि कपडे मळवून घेतलेनियंत्रण करणारे कॅडमियमकोटेड रॉड्स . दोरीला टांगले होते आणि त्यांना हाताने ओढून वरखाली करण्यासाठी तीन निधड्या छातीचे शिलेदार

पाईलच्या माथ्यावर उभे होतेही गंभीरप्रयोगात का . स्वरूपाची गफलत झाली असतीच तर ते थेट आसमानात गेले असतेयाशिवाय एक खूप . शक्तीशाली आणि वजनदार वेगळा रॉड टांगून ठेवला होता आणि संदेश मिळाला की तत्क्षणी त्याच्या दोरीवर घाव घालून तिला तोडण्याच्या तयारीने एक जवान हातात कु.उभा होता हाड घेऊन त्याच्या शेजारी सज्ज- त्याला SCRAM—the safety control rod ax-man असे नाव दिले होतेपाईलमधल्या न्यूक्लियर . रीॲक्शन प्रमाणाबाहेर जाऊ लागल्या असल्याची शंका आल्यास त्या माणसाने कुहाडीचा घाव घालून ती दोरी - तोडायची आणि तो रॉड पाईलमध्ये खाली पडला की रीॲक्शन नक्की बंद पडणारच अशी व्यवस्था होती .

गरज पडताच रिॲक्टरला आपोआप बंद पाडण्याची स्वयंचलित 'ट्रिप' किंवा 'शट डाऊन सिस्टम' प्रत्येक रिॲक्टरमध्ये असतेचअमेरिकेत त्यांना आज .ही 'स्क्रॅम' असे म्हणतात.

या प्रयोगासाठीसुध्दा अफाट खर्च आला होतात्यासाठी वापरले गेलेले तीनचारशे . टन ग्राफाईट आणि कित्येक टन युरेनियम यांचीच किंमत त्याकाळी कोटींच्या घरात, म्हणजे आजच्या काळातील अब्जावधी रुपये एवढी होतीआणि त्यातून जेवढी . ऊष्णता बाहेर पडत होती त्यावर एक कप चहासुध्दा झाला नसतापण अणूशक्तीचा . उपयोग करून त्यातून भरपूर प्रमाणात ऊष्णता निर्माण करणे हा या प्रयोगाचा उद्देश नव्हताचएक अखंड साखळी (फिशन) भंजनाची . तयार करता येईल अशी जी कल्पना पुढे आली होती, त्या कल्पनेचा पुरावा प्रत्यक्ष प्रमाणातून मिळवणे हा या प्रयोगाचा एकमेव उद्देश होताएकदा ते सिध्द झाले की पुढे जाण्याचा . मार्ग प्रशस्त होणार होताजवळ जवळ अर्धा तास या पाईलशी हो नाही चा खेळ . खेळून घेतल्यानंतर आपल्याला हवे तेंव्हा भंजनक्रियेची साखळी न्यूक्लियर) चेन रिॲक्शनसुरू करता येते (, अपेक्षेनुसार ती सुरू होते, त्यानंतर ती आपोआप चालत राहते आणि नको वाटली की तिला लगेच बंदही करता येते याची शास्त्रज्ञांना पूर्ण खात्री पटलीत्यांच्या मनातून तसे वाटत असले . तरी त्यात कसलाही अनपेक्षित गोंधळ होणार नाही याचा प्रत्यक्ष पुरावा हवा होता. तो मिळाल्यानंतर त्यांनी हा पाईल कायमचा बंद करून टाकला, दोन तीन महिन्यातच त्यातले सारे सामान जसे रचले होते तसेच ते उतरवले आणि नव्या जागी पुन्हा व्यवस्थितपणे रचून आपले पुढील प्रयोग सुरू केले.

मानवाच्या भवितव्यावर एवढा मोठा प्रभाव ज्याने पडला अशा या ऐतिहासिक प्रयोगाबद्दल त्या काळात मात्र कमालीची गुप्तता बाळगली होतीत्यात मिळालेल्या माहितीला . तर कणभर

देखील प्रसिध्दी दिली गेली नाहीच, या प्रयोगावर काम करणाया- शास्त्रज्ञांच्या बायकांनादेखील आणखी काही वर्षे उलटून जाईपर्यंत असा प्रयोग केला गेल्याबद्दल सुध्दा अवाक्षर समजले नव्हते या .शास्त्रज्ञांनी अनेक दिवसरात्र काम करून केलेल्या अथक परिश्रमानंतर मिळालेल्या यशाने खूष होऊन श्रमपरिहार करण्यासाठी एक लहानशी पार्टी केलीत्या पार्टीत कोणीतरी . डॉफर्मी यांचे अभिनंदन करताच ते कशाबद्दल असे त्यांच्या पत्नीने त्यांना. विचारलेआयत्या . वेळी एक थापमारून त्या सहकायाने ती वेळ निभावून नेली-, पण त्यानंतर त्या थापेशी सुसंगत अशी उडवाउडवी त्यांना करत रहावी लागली

श्री. आनंद घारे http://anandghan.blogspot.com/

# नाथांचा नाथ जगन्नाथ !!

मागच्या वेळी जेव्हा जगन्नाथ पुरीला गेलो होतो तेव्हा दर्शन घेवून परतताना मनात एक खंत राहून गेली होती की पुरी च्या भव्य जगन्नाथ मंदीराची छायाचित्रे घेता आली नव्हती. तिथे कॅमेरा घेवून जाण्याची वा छायाचित्रे घेण्याची परवानगी नाहीये. कालच्या जानेवारी महिन्यात एका कॉन्फरन्सच्या निमीत्ताने हैदराबादला जाण्याचा योग आला. तेव्हा तेथील बंजारा हिल्सवर असलेले देखणे जगन्नाथ मंदीर पाहण्यात आले. अगदी हुबेहुब जगन्नाथ पुरीच्या मंदीराप्रमाणे नसले तरी जवळ जवळ त्याची प्रतिकृतीच असलेले हे देखणे मंदीर कॅमेऱ्यात कोंबण्याचा मोह आवरला नाही. अर्थात ज्याची भव्यता डोळ्यात मावत नाही ती कॅमेऱ्याच्या लेन्समध्ये काय मावणार म्हणा?


प्रचि १ :



प्रचि २ : प्रवेश द्वार





प्रचि ३ :



प्रचि ४ : मुख्य मंदीराचे समोरून काढलेले प्रचि




प्रचि ५ : ती भव्य वास्तू कॅमेऱ्याच्या लेन्समध्ये बसवण्याचा तोकडा प्रयास




प्रचि ६ : भिंतीवरील सुबक कलाकृती






प्रचि ७ : कालियामर्दन करणारा कन्हैय्या आणि देवाधिदेव इंद्र





प्रचि ८ : साईड व्ह्यु





प्रचि ९ :




प्रचि १० : मुख्य मंदीराचा गाभाऱ्याचा कळस (कबुतरांनी आपले विश्रांतीस्थळ बनवलेय बहुदा तिथे 😉)





प्रचि ११ :




प्रचि १२ : एका कळसावरीला देवी शारदेची ही सुंदर मुर्ती



प्रचि १३ : जगन्नाथ पुरीचे मंदीर तसेच कोनार्कचे सुर्यमंदीर उभे करणाऱ्या गंग साम्राज्याचे एक चिन्ह




प्रचि १४ : मुख्य गाभाऱ्याचा कळस : दिव्यत्वाची जेथ प्रचिती...




➤ विशाल कुलकर्णी http://yedchap.blogspot.com



# Moodturn.com सोबत निसर्गाच्या सानिध्यात रममाण व्हा !




वारा, पाणी, पाऊस, समुद्र, जंगल या सर्व निसर्गनिर्मीत गोष्टींमध्ये एक विलक्षण शक्ती असते. मनाला शांत करणारी, सुखावणारी एक वेगळीच भावना निसर्गाच्या सानिध्यात आल्यावर निर्माण होते. शहरी भागात राहणाऱ्या लोकांना निसर्गामध्ये रममाण होणे नेहमीच शक्य नसते त्याची पण ओढ मात्र नक्की असते. आज आपण एक अशी वेबसाईट पाहणार आहोत जिच्या सहाय्याने आपल्याला घरबसल्या या सर्व गोष्टींचा आनंद घेता येईल.

मित्रहो आपण बोलत आहोत मुडटर्न.कॉम (Moodturn.com) या साईटबद्दल. Moodturn मध्ये पावसाचा आवाज, पक्ष्यांच्या चिवचिवाटाचा आवाज, वर्षावनात जाणवणारा विषीष्ट आवाज, किनाऱ्यावर आदळणाऱ्या लाटांचा आवाज असे अनेक अत्यंत खरेखुऱ्या आवाजांची रेकॉर्डींग आहे. या साइटला भेट द्या, आपली आवडती आवाजाची थीम निवडा आणि आपला आवडता आवाज पाहिजे तितका वेळ ऐकत रहा. ब्राउजर मध्ये moodturn चालू ठेवुन आपण संगणकावरील आपले काम चालु ठेवु शकतो.

मुडटर्न मध्ये आवाजाबरोबर या सर्व निसर्गदृष्यांची चित्रे देखिल आहेत. जिवंत वाटणारी ही चित्रे आणि त्यासोबतचे आवाज आपल्याला खरोखरच निसर्गाच्या सानिध्यात घेउन जातात. एकदा ही साईट चालु करुन पहा. थोड्याच वेळात आपण या आवाजाशी एकरुप होउन जातो. मग आपण खरोखरच समुद्रकिनारी, जंगलात किंवा नदीकिनारी असल्याचे भासू लागते.

मला स्वतःला समुद्राच्या लाटांच्या आवाजाचे प्रचंड आकर्षण आहे. म्हणून नेहमी एखादी ब्लॉगपोस्ट लिहत असताना किंवा वेबसाईट डीझाईनचे काम करत असताना मी moodturn वरील समुद्राच्या लाटांचा आवाज ऐकतो. त्यामुळे मनावरचा ताण हलका होउन माझी कार्यक्षमता वाढते असा माझा वैयक्तीक अनुभव आहे. तुम्हीही पहा आजमावून. मला खात्री आहे की तुमचाही मुड टर्न होउन जाईल :-)

➤सलील चौधरी http://www.netbhet.com

# लिलूच्या गजाली.

“मला एकच प्रश्न आहे आणि तो म्हणजे झालं ते झालं आता पुढे काय?” हे ऐकून तिला खूपच गहिवरून आलं.

दुपारी अकराची वेळ असावी.मी चर्चगेट वरून फाऊन्टनच्या दिशेने जात होतो. वाटेत हायकोर्टच्या फुटपाथकडे वळलो असेन,एकदम एक व्यक्ती अचानक सामोर दिसली.
“अरे तू मला ओळखलं नाहीस? मी लिलू कोचरेकर”
असं म्हणून ती ज्यावेळी हंसली,त्याबरोबर मला तिची ओळख पटली.तिच्या अंगातला काळा कोट आणि ती गळ्यातली सफेद वकिली कॉलर,हातातली ब्रिफकेस बघून मी तिला म्हाणालो,
“अगं तू वकील केव्हां झालीस ?”
“असं काय? तुला माहितच नाही काय ? मी आता गेली दहा वर्ष हायकोर्टमधे केसीस चालवते” असं ती मला म्हणाली.

कोचऱ्याला माझ्या वहिनीच्या माहेरचे शेजारी- कोचरेकर, त्यांची लिलू मुलगी होती.
तिथून माझी ह्या कोचरेकर मंडळीशी ओळख होती.
“ये रे माझ्या घरी कधीतरी विकएन्डला.”
लिलू म्हणाली. “पुढच्याच विकएन्डला ये, फादर्सडे आहे नाही का? “
मी हो म्हटलं आणि मी तिला “बरंय”
म्हणून पुढच्या कामाला गेलो.

ती गिरगांवात राहात होती.तिने मला तिचा पत्ता पण दिला.त्या दिवशी मी जेव्हा तिच्या घरी गेलो तेव्हा घरी तिची मुलगी होती.नवरा फिरतीवर दिल्लीला गेला होता. लिलूने अनंताश्रमातून दुपारच्या जेवणाची ऑर्डर दिली होती.मला काय आवडतं ते तिला माहित होतं. तिसऱ्याचं सुकं,बांगड्याचं तिखलं, पापलेटची आमटी, तळलेली सरंग्याची कापं, आणि लाल सोलाची सोलकढी एव्हयडे जिन्नस होते. भात मात्र घरीच केला होता, मला मास्यांचं जेवण असताना भात खूप लागतो हे पण तिच्या लक्षात होतं.
“सगळं जेवण तयार आहे,दोन वाजता जेवूया” ती म्हणाली.

आणि कप,कप चहावर आमच्या जुन्या आठवणी काढून गजाली (गोष्टी) चालू झाल्या.
“आईवडील कसे आहेत ?”
ह्या माझ्या प्रश्नावर तिनेच सुरवात केली, तिची बातचीत संपेपर्यंत जेवण केव्हा झालं आणि बाहेर अंधार केव्हां झाला हे आम्हाला कळलंच नाही.
माझ्या प्रश्नाचे उत्तर देताना ती बोलत होती, आणि मी फक्त ऐकत होतो.

फादर्सडे असल्याने तिने आपल्या वडीलांचाच विषय चालू केला.
“माझ्या पन्नासाव्या जन्मदिवशी माझे वडील मला एक अजोड किंमतीची भेट देउन गेले.ते त्याच दिवशी वारले रे” त्यांच्या मरणशैयेवरून मला ते माझ्या आयुष्याचा एक अनमोल धडा शिकवून गेले. त्यांच्या ८६ व्या जन्मदिवसाच्या तीन आठवडे आधी त्यांना रक्ताचा कॅन्सर झाल्याचं डॉक्टरनी आम्हाला सांगितलं. तीन आठवड्यानंतर ते गेले. आतापर्यंतच्या आयुष्यातल्या वागण्याच्या त्यांच्या पद्धतीनुसार, ह्याही गोष्टीवर त्यांचा ताबा ठेवून त्यांच्या इच्छेप्रमाणे ते गेले. आम्हा सर्वांच्या इच्छेप्रमाणे मात्र ते घरीच गेले.
मला आठवतं त्या प्रसंगी मी माझ्या आईवडीलांच्या खोलीत बसले असता, त्यांच्या उभ्या आयुष्याचा मागोवा घेत असल्याचे जाणवून, किती कणखर आणि किती यशस्वी त्यांचं आयुष्य होतं, हे मी लक्षांत आणलं.

माझ्या वडीलानी आपल्या बायकोची आणि आम्हा तीन मुलांची काळजी घेण्यासाठी तत्परतेने प्रयत्न करीत असताना, इतर सगळ्या जवळच्याना दुखवलं होतं. त्यांचं अखेरचं दर्शन घेण्यासाठी, त्यांच्या खोलीत दुखावलेल्या जवळच्यांची लागलेली रीघ बघून, जणू विमान अपघात होवून खाली पडलेल्या सांगाड्याकडे पहात असलेल्या, वाचलेल्यापैकी प्रवाशासारखी माझी दैना झाली होती.

माझे वडील एक नामांकीत लेखक,असून माझे डोळे दिपून जातील एव्हडे चातुर्यवान, अत्यंत दयाळू आणि बुद्धिमान असून सुद्धा त्यांच्यात एक खोट होती, हे मला कित्येक वर्षापासून माहीत होतं.त्यानी त्यांच्या नेहमीच्या, हताश मनस्थीतून निर्माण होण्याऱ्या, उद्वेगावर-म्हणजे रागावर- कसलीच डॉक्टरी मदत घेतली नाही.त्याना मदत घे म्हणून निक्षून सांगण्याचं कुणालाही धारीष्ट झालं नाही किंवा, “वेळीच मदत घ्या अथवा कुटुंबाला मुकाल”
असंही सांगण्याचं धारिष्ट झालं नाही.

त्यांच्या मृत्युशय्येवरून त्यांनी मला जी गोष्ट शिकवली ती ते माझे वडील असूनही शिकू शकले नाहीत. कुटुंबियांशी प्रेमळपणे राहायचं असेल तर स्वतःच्या तृटीशी आणि स्वतःच्या चुकांशी दोन हात केल्याविना गत्यंतर नाही. हे त्यांना वेळीच समजलं नाही.

लिलूकडून हे सर्व ऐकत असताना चवदार मासे केव्हा फस्त झाले हे कळलंच नाही.जेवण संपल्यावर हात धूऊन उठल्यावर लिलूने सर्व आवरून घेउन मसालेदार पान माझ्या हातात आणून दिलं.मासे खाल्यावर मला पान लागतं ते पण तिला आठवलं.
"मी माझ्या वडीलावर खूप प्रेम केलं.मी सहा वर्षाची असताना पहिली गोष्ट लिहीली त्याबाबतीत ते माझे गुरू होते.मी भावंडात शेंडेफळ असल्याने बरेच वेळा मला त्यानी समजून घेतलं,माझ्याशी विनोदी वृत्तीने वागले.माझ्यावर कधी चिडले नाहीत. हे सर्व ते माझ्या मोठ्या भावंडाना देऊ शकले नव्हते.

बरेच वेळा माझ्या वडीलांच्या रागाचं वादळ शांत झाल्यावर, आमची आई आश्वासन देउन आम्हाला म्हणायची, "मी खात्रीने सांगते ते रागाबरोबर बोलले जरी, तरी त्यांचं तुमच्यावर अत्यंत प्रेम आहे" त्यांच्या आरडाओरडीचा जोर कमी कमी झाला की ते मंद्रसप्तकात आपला आवाज आणून पश्चाताप झाल्यासारखं करून आम्हाला दिलासा देत पुन्हा असं न होण्याचा जणू आश्वासानच देत असत. बराच विचार केल्यावर मला वाटू लागलं की, माझे वडील एक उपचार न झालेले रागीष्ट-विकारी असून, त्यांचा अविचारी राग आणि चांगली मनसथिती ह्या दोलायमानाचा परिणाम, आमच्या आईच्या आणि आम्हा तीन मुलांच्या मनस्थितीची,मनाच्या चलबिचलतेमुळे, चाळण होत आहे."

दुपारचे चार वाजले.लिलूने आपली गजाल जरा आवरती घेउन मला म्हणाली,
"तू खरोखरच बोर झाला असणार,मी थोडा चहा करते"
असे म्हणून ती चहा करायला गेली,आणि मला पण बाथरूममधे जाउन फ्रेश व्हायची संधी मिळाली.

चहाचा कप पुढे करीत ती म्हणाली,
"मी कुठे थांबली होते?हां,हां लक्षात आलं "
असं म्हणून तिने पुढे सांगायला सुरवात केली.
" रागीष्ट-विकारी" असे मी त्याना मघाशी म्हणाले त्याचा अर्थ ते जसा एखादा, रागाच्याभारात व्हायोलंट होवून खिडक्यांच्या कांचा फोडतो तसं काहिही करीत नव्हते.

एखादी माझ्या वडीलांसारखी व्यक्ति- जिच्या वागण्याची परिणीती, रोजच्या अडचणी आणि हताश परिस्थिती पाहून, उद्बेग करण्यात आणि माथेफीरू होण्यात आपोआप होत असते,तेव्हा अशा व्यक्तिला मनोवैज्ञानीक “ड्राय ड्रंक” अशा सज्ञेत वर्णन करतात पुष्कळदा बाहेरच्या जगात असे लोक आपला राग आणि चीडखोरपणा आवरून घेतात,परंतु घरच्या चार भिंतीत मात्र त्यांचा तो राग उचंबळून येतो.माझे वडील खऱ्या संकटकाळी क्वचीतच आरडा-ओरडा करीत. पण ते केव्हा फिरतील हे आम्हा घरच्या मंडळीना सांगणं कठीण व्हायचं.
अगदी जसं एखाद्या दारू पिणाऱ्याच्या घरच्या मंडळीना, सामोरं केव्हा जावं लागेल हे समजत नाही तसं.आणि म्हणून घरचे आम्ही सतत नवीन संकटाचं तुफान न येण्यासाठी सतर्क राहून त्याना चिडायला होईल असं कारण देत नसू.

आमच्या घरात आमचं चलबीचल स्थितित असणं हे आम्ही ओघानेच शिकलो होतो. जस जशी मी वयाने मोठी होत गेले तस तशी ह्या संवयीतून, सुटका करण्यासाठी मी माझ्या वडीलांबरोबर अगदी प्रामाणिक असायची.जरी त्यांच्या तावडीतून सुटका झाली तरी, त्यांच्या रागीष्टपणामुळे संकटाला तोंड द्यायला मी असमर्थ असायची.
माझ्या वडीलाना ते गेल्या दिवशी भेटायला जमलेल्या जवळच्यांच्या डोळ्यात पाहिल्यावर त्यांचे डोळे मला सांगत होते की,
“वेळीच उपचार न झाल्यामुळे तुमच्या वडीलांच्या रागीष्ट विकाराने, घरातल्या तुम्हा सर्वांवर भावनीक आघात नव्हे तर शारिरीक आघात सुद्धा झाला असून,तुम्हा सर्वांच्या मनाला लूळं करून टाकलं आहे.”
आमची आई, माझ्या वडीलांची विश्वासू पत्नी होती,तिच्यावर झालेल्या मानसिक आघातामुळे,ती अनेक शारिरीक विकृत्यानी अंथरूणाला खिळली होती.

तिचं तरूण वयातलं जीवन तिने त्यांचा सततचा चीडचीडेपणा,आरडा-ओरड सहन करीत घालवलं होतं. हे दृश्य सहन न होण्यासारखं असायचं.तिची मानहानी करून झाल्यावर, आपल्या कमकुवतेची ते तिला कबुली देत,दयेचा आणि भेटींचा जणू पाऊस पाडीत,आई त्यांची समजूत घालायची. आणि मोठया मनाने त्यांना समजून घ्यायची. हिच त्यांची एकमेकावर प्रेम करण्याची रीत असायची.”

लिलूच्या लक्षात आलं की स्वीट-डीश म्हणून तिने ताजे बेसनचे लाडू माझ्यासाठी केले होते, मला हे लाडू आवडतात हे पण तिच्या आठवणीत होतं.

“अरे मी माझी ही कर्मकथा सांगता सांगता बेसनचे ताजे लाडू तुझ्यासाठी केलेत ते द्यायला विसरले बघ.कप कप चहापण करते”
असं म्हणून ती आत गेली.जरा पाय मोकळे करण्यासाठी मी उठून गॅलरीत फ्रेश हवा घेण्यासाठी म्हणून गेलो.

गरम गरम चहा आणि बेसनचे चार लाडू घेऊन लिलू बाहेर आली.आणि पुढच्या गजाली तिने चालू केल्या.
” वय वाढत जाता जाता माझ्या आईचे स्नायू आणि पोट अगदी गाठावलेलं झालं होतं.डॉक्टर म्हणाले, स्ट्रेस मुळे तिने हळू हळू मृत्युची वाट धरली आहे.
माझा भाऊ पण मधुमेयाने आणि पार्किनसन मुळे अपंगावस्तेत होता.परंतु,मला जे आठवतं त्यानुसार तो भावनिक अपंग होता आणि स्वतःबद्दल आत्मविश्वास गमावल्यामुळे पंगु झाला होता.जर का जीवन हे एक लॉटरी आहे असं समजलं,तर माझ्या भावाजवळ बक्षिस न मिळणारं तिकीट होतं असं समजायला हरकत नाही.
माझा भाऊ माझ्या वडीलांची स्वप्नपुर्ती करायला असमर्थ ठरला.त्यांचं त्याच्यावर खूप प्रेम होतं.पण प्रेमाचा त्यांचा अर्थ सतत एखाद्याच्यामागे लागणं!
असा होता असावा. आणि त्यामुळे माझ्या भावाचा कायापालट स्वतःलाच कमी लेखण्यात झाला.त्याचं कधी लग्न झालं नाही, नाही तो आयुष्यात काही बनू शकला, आणि शेवटी वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी, एक अपंग म्हणून एका नर्सिंग होममधे जीवन कंठीत होता.

माझ्या भावाच्या तुलनेत माझी मोठी बहिण त्यामानाने एक सुखी जीवन जगत होती. पण त्याचं कारण ती माझ्या वडीलांपासून दूर होती. जवळ जवळ तिचे त्यांच्याशी संबंधच तुटले होते.त्यामुळे त्यांच्या शेवटच्या दिवसात तिन मुलांपैकी एकच मुल (मी) त्यांच्या जवळ हजर होतं.

जेव्हा माझे वडील मानसिक आणि शारिरीक वेदनेतून मृत्युच्या दिशेने प्रवासाला लागले होते,तेव्हा माझ्या मनात वरचेवर एक विचात येत असायचा. आणि तो म्हणजे हा त्यांचा दुःख देणारा अंत, स्वतःच्या आणि इतरांच्या जीविताला हानी देऊन जात आहे. माझ्या वडीलाना वेळीच उपचार मिळाले असते,तर हे सर्व टाळता आलं असतं.

अगदी अलिकडे अलिकडे समाजाने दारू पिणाऱ्या व्यक्तिंचं व्यसन ही एक जोरात पसरणारी समस्या असल्याचे स्विकारून, ते व्यसन त्यालाच नाही तर त्याच्या कुटुंबियाना पण दुःखाच्या

खाईत लोटू शकतं, असं ओळखलं आहे.आणि त्या व्यक्तिला उपचार करून बरं करता येतं हे पण जाणलं आहे.

त्याशिवाय उपचार करणाऱ्या संस्था पण अस्तितवात आहेत, समस्यांचा अभ्यास करून कुटुंबाने त्या समस्यांशी दोन हात करून,कशी सईसलामत सोडवणूक करून घ्यायची हे पण शिकवलं जातं,परंतु रागीष्टपणाच्या विकारावर असले काही उपाय अजून दिसत नाही.उलट हा रागीष्टपणा म्हणजे एक व्यक्तिगत स्वाभाविक दर्गूण आहे, असा समज झालेला आहे.

खूप उशीर झाल्याने मी लिलूची रजा घेतली,पण
” उरलेली तुझी कथा ऐकायला मी पुढच्या आठवड्यात नक्की येतो पण जेवायला नाही फक्त चहा प्यायला “ असं आश्वासन दिलं.ती हिरमुसली होऊ नये म्हणून,
“तुझ्या कथेचा शेवट चांगलाच होणार आहे.” असं मी लिलूला जाता जाता म्हणालो.

पुढच्या विकएन्डला मी तिला फोन करून सांगितलं की मी संध्याकाळी चहाच्यावेळी येईन.आणि त्याप्रमाणे मी तिला भेटलो.मला पाहून तिचा चेहरा खूपच आनंदी दिसला. मलाही फार बरं वाटलं. इकड्च्या तिकडच्या गप्पा झाल्यावर,मला म्हणाली,
“शाब्दिक मार जखमेच्या खूणा दाखवित नाही. झालेलं नुकसान डोळ्यांना दिसत नाही. जर का शारिरीक नुकसान झालं नसेल तर डॉक्टरपण मुद्दाम म्हणून लक्ष घालीत नाहीत, जोपर्यंत रुग्ण त्यांची मदत मागत नाही तोपर्यंत. खूपदा मी आणि माझी आई माझ्या वडीलाना तपासून घ्या म्हणून मागे लागत असू, पण त्यानी कधीही आमचं म्हणणं ऐकलं नाही.

एकदा आमच्या डॉक्टरने आम्हाला असं सांगितलं की आमच्या आईची प्रकृती दिवसे दिवस खालावत जाण्याचे कारण मुख्यतः आमच्या वडीलांचा तिच्यावर होणारा शाब्दिक अत्याचार हा आहे.आणि जेव्हा आम्ही डॉक्टरना, वडीलाना उपचार देण्याची विनंती केली,त्यावर ते म्हणाले,
“हा उतार वयातला प्रॉब्लेम असून ते स्वतः माझ्याकडे तपासायला आल्याशिवाय उपचार करणं शक्य होणार नाही.”

मागे एकदा मी मनोवैज्ञानीकांना भेटून वडीलाना उपचार देण्याचा प्रयत्न केला.हा काही बरा न होणार असा विकार नाही असं बऱ्याच तज्ञाचं मत होतं.शब्दिक अत्याचार हा शारिरीक अत्याचारापेक्षा गंभीर असून त्याचे दूरवर परिणाम होतात.”

परत एकदा चहा करण्यासाठी लिलू आत गेली आणि चहा घेऊन आल्यावर पुढे म्हणाली ते मला खूपच धक्कादायक वाटलं.

"माझे वडील निर्वतल्या नंतर तीन महिन्यानी माझी आई गेली.मी अपेक्षा करीत होते की निदान ते गेल्यानंतर तरी शाब्दिक अत्याचाराविना ती उरलेले आयुष्य आनंदात घालविल, हे माझे फक्त मनोरथच ठरले."

६३ वर्षांचं त्या दोघांचं आयुष्य एकमेकाशी कमालीचं गुंतलेलं होतं.अगदी तसंच माझ्या भावाचं भविष्य पण. माझ्या वडीलांच्या पहिल्या डेथ ॲनिव्हर्सरी नंतर अवघ्या पांच दिवसानी माझा भाऊ गेला. माझ्या वडील त्यांच्या पश्चात मला त्यांची एक आठवण ठेवून गेले.त्याचा मला माझ्या उरलेल्या आयुष्यात उपयोग झाला.

वर्षापूर्वी मी आईवडीलांच्या खोलीत बसले असताना एक संकल्प केला. काही होवो, ह्या पुढे असे प्रकार माझ्या पिढीत किंवा माझ्या नंतरच्या पिढीत तरी रीपीट होऊ नयेत.

एकदा एका मनोवैज्ञानीकाला माझ्या आई,वडील आणि भावाचे फोटो दाखवले ते पाहून तो पटकन म्हणाला, " कुणाच्याच तोंडावर हंसं दिसत नाही. ते सर्व दिसतात डिप्रेस्ड,डिप्रेस्ड आणि डिप्रेस्ड."

आता पर्यंत लिलूची ही सर्व कथा निपूटपणे एकून घेत होतो.लिलू मला म्हणाली,

"माझं हे सर्व ऐकून मी तुला उगीचच त्रास दिला असं नाहीना वाटत.अरे,आपल्या जवळच्याकडे ओघ घालवायला बरं वाटतं."

त्यावर मी म्हणालो हो, "मला एकच प्रश्न आहे आणि तो म्हणजे झालं ते झालं आता पुढे काय? "हे ऐकून तिला खूपच गहिवरून आलं.

डोळ्यात पाणी आणून म्हणाली,

" मी मेल्यावर माझ्या कुटुंबाचा फोटो-आल्बम पाहून माझ्या मुलीला आमच्या सर्वांच्या चेहऱ्यावर हसं,हसं आणि हसंच दिसलं पाहिजे हीच माझी अपेक्षा आहे."

➤श्रीकृष्ण सामंत http://shrikrishnasamant.wordpress.com/

# Gmail Security Check List




तुम्ही जीमेल (Gmail) वापरता का? उत्तर "हो" असेल तर इथे लक्ष द्या. (जीमेल अकाउंट नसलेला नेटकरी अजुन मला तरी भेटलेला नाही !).

ईमेल्स साठी आपण हमखास Gmail वापरतोच पण त्याच सोबत मिळणाऱ्या Gtalk, Google Docs, Orkut, blogger या सेवांसाठीपण आपण Gmail वापरतो. त्यातच Gmail ने 7 GB हून अधिक जागा ईमेल्ससाठी मोफत उपलब्ध करून दिली आणि आपण ईमेल्स डिलीट करणे कायमचे विसरून गेलो. तर असा हा Gmail Inbox आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे यात कुणाचेच दुमत नसावे. Gmail मध्ये आपला बराच महत्त्वाचा डेटा आणि माहिती समावलेली असते म्हणूनच Gmail अकाउंट हॅकर्स पासून सुरक्षीत ठेवणे अत्यावश्यक आहे.
गेल्या काही महिन्यात Gmail अकाऊंट हॅक होण्याचे प्रकार वाढले आहेत आणि म्हणून गुगलकाकांनी स्वतःच जीमेल अकाउंट जपण्याविषयीची माहिती जीमेल वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करून दिली आहे. Gmail Security Check List या लिंकवर ही माहिती उपलब्ध आहे. नेटभेटच्या वाचकांसाठी ही माहिती मी मराठीत (थोडक्यात) देण्याचा प्रयत्न करत आहे. जीमेल सीक्युरीटी चेकलीस्ट मुख्यत्वे ५ भागांत विभागलेली आहे. प्रत्येक भागामध्ये २-३ उपविभाग आहेत. या लेखामध्ये आपण या ५ मुख्य प्रकारांची थोडक्यात माहिती घेणार आहोत.

**Part 1: Your Computer (संगणक)**

या भागामध्ये तुमच्या संगणकाच्या सुरक्षेसंबंधी टिप्स दिल्या आहेत. संगणकामधील व्हायरस आणि मालवेअर वेळीच शोधुन त्यावर उपाय योजना करणारे अँटीव्हायरस सॉफ्टवेअर्स इंस्टॉल करणे आणि अद्ययावत ठेवणे याबाबत येथे माहिती देण्यात आली आहे. तसेच गुगल पॅक मध्ये मिळणाऱ्या मोफत अँटीव्हायरस सॉफ्टवेअर्सची आणि इतर उपयोगी अँटीव्हायरस सॉफ्टवेअर्सच्या लिंक्स देखिल येथे देण्यात आल्या आहेत.
संगणकाची ऑपरेटींग सीस्टम आणि इतर प्रोग्राम्स (Third party softwares) सुरक्षीत आणि अद्ययावत ठेवण्याबाबत टीप्स देखिल यामध्ये देण्यात आल्या आहेत.

**Part 2: Your Browser (इंटरनेट ब्राउजर)**

इंटरनेट ब्राउजर्स हे कोणत्याही हॅकर्सचे किंवा व्हायरसेसचे आवडते अप्लिकेशन असते कारण संगणकामध्ये किंवा ईमेल अकाऊंट मध्ये शिरकाव करण्यासाठीचा हा सर्वाधिक सोपा मार्ग आहे. इंटरनेट एक्स्प्लोरर, क्रोम, फायरफॉक्स, ओपेरा, सफारी यापैकी आपण वापरत असलेले ब्राउजर्स आणि add ons /extensions अद्ययावत ठेवण्याबद्दल माहिती या भागात देण्यात आलेली आहे. माझ्या मते गुगल क्रोम हा सध्याचा सर्वाधिक सुरक्षीत मानला गेलेला वेब ब्राउजर आहे.

**Part 3: Your Google Account (गुगल अकाउंट)**

जीमेल अकाउंटचा पासवर्ड सतत बदलत राहण्याचे महत्त्व, हॅक केलेला/विसरलेला पासवर्ड परत मिळविण्या संबंधीची माहिती आणि चांगला पासवर्ड निवडण्यासंबंधीच्या काही टीप्स या भागात देण्यात आल्या आहेत.

**Part 4: Your Gmail Settings (जीमेल सेटींग्ज)**

जीमेल अकाऊंटमध्ये असलेल्या सेटींग्ज देखिल ईन-बॉक्सच्या सुरक्षीतते संबंधी उपयुक्त ठरतात. उदाहरणार्थ जीमेल सोबत http:// ऐवजी HTTPS:// हा सुरक्षीत प्रोटोकॉल वापरणे, जीमेल ईनबॉक्समध्ये सगळ्यात खाली "Last account activity" नमूद केलेली असते तिच्या सहाय्याने

आपल्या ईमेल अकाउंटमध्ये झालेल्या काही गैरप्रकारासंबंधीची माहिती मिळवणे अशा टीप्स जीमेल सेटींग्ज या भागात दिलेल्या आहेत.

**Part 5: Final Reminders (आणखीन काही महत्त्वाच्या सूचना)**

- जीमेल कधीही कोणत्या मेसेज किंवा ईमेलद्वारे तुमचे युझरनेम आणि पासवर्ड संबंधी विचारणा करणार नाही. त्यामुळे अशी विचारणा करणाऱ्या ईमेल्सपासून सावध रहा.
- तुम्हाला पाठविल्या गेलेल्या कोणत्याही लिंकवर क्लिक करुन त्यानंतर तुमचा ईमेल पत्ता आणि पासवर्ड टाईप करु नका. नेहमी https://mail.google.com किंवा https://gmail.com/ हा पत्ता ब्राउजर मध्ये टाईप करुनच आपला ईमेल बॉक्स उघडावा.
- इतर वेबसाईट्सना आपला जीमेल पासवर्ड देऊ नका कारण या वेबसाईट्सच्या सत्यासत्यतेची खात्री गुगल देउ शकत नाही. (सध्या अनेक सोशल नेटवर्कींग साईट्समध्ये आपल्या Gmail contacts ला आमंत्रणे पाठविण्याची सोय असते. पुर्णपणे खात्री असल्याशिवाय अशा साईट्सना आपला पासवर्ड देऊ नये.
- "Stay signed in" या पर्यायाचा वापर तेव्हाच करा जेव्हा तुम्ही स्वतःचा संगणक वापरत असाल. कॉलेज, हॉटेल, सायबर कॅफे किंवा ऑफीसमधील संगणकांचा वापर करताना या पर्यायाचा कटाक्षाने वापर टाळा.
- ईमेल वाचुन झाल्यावर Sign Out करायला विसरु नका.

मित्रहो, तशा साध्यासोप्या वाटणाऱ्या या टीप्सकडे दुर्लक्ष करु नका. ऑनलाईन सुरक्षेची सुरुवात आपल्या ईमेल अकाउंटपासून आजच करा.

➤सलील चौधरी http://www.netbhet.com